


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०२ ● अंक : १७ ● पुणे ● शनिवार, दि. २२ फेब्रुवारी २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313



विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी चर्चासत्र! 3



एमआयटी एडीटी विद्यापीठात शिवजयंती जल्लोषात 4

## ठळक बातम्या

### साउंड बॉक्स बनविणारा कारखाना खाक

वाघोली (आरंभ पर्व): मांजरी खुर्द मधील थेऊर रोडवरील आर ए कॅबिनेट या साउंड बॉक्स बनविणाऱ्या कारखान्याला शुक्रवारी पहाटे पावणे पाच वाजण्याच्या सुमारास आग लागली. यामध्ये कारखाना पूर्ण जळून खाक झाला. पाच खाजगी टँकरच्या मदतीने चार अग्निशमन वाहनांनी ही आग आटोक्यात आणली. आग लागल्याची घटना कळताच पी एम आर डी ए च्या दोन व महापालिकेच्या दोन अशा एकूण चार अग्निशमन वाहने घटनास्थळी दाखल झाले. त्यावेळी आग चांगलीच भडकली होती. अग्निशमन वाहनांनी आग विझविण्यास सुरुवात केली. मात्र तो पर्यंत आतील सी एन सी प्लायवूड कटिंग मशीन, एअर कॉम्प्रेसर, प्लायवूड, साऊंड स्पीकर बॉक्स, व मोकळे साउंड बॉक्स, लोखंडी जाळ्या,साऊंड मशनरी, साऊंड बनवण्यासाठी लागणारे साहित्य व साऊंडचे कलर थीनेर आदी वस्तू जळून खाक झाल्या. विजय सोनवणे यांच्या मालकीचे हा कारखाना आहे. आगीचे कारण कळू शकले नाही.

### अपघातात दोघांचा मृत्यू

पिंपळवंडी (आरंभ पर्व): चाळकवाडी येथे पुणे नाशिक महामार्गावर गुरुवारी (ता. २०) रात्री साडेअकराच्या सुमारास झालेल्या अपघातात दोघांचा मृत्यू झाला. पिंटू लालू मेंगाळ (वय-३७) व प्रफुल्ल मिलिंद इंगळे (वय-१७) हे दोघे या अपघातात मृत्युमुखी पडले. पिंटू मेंगाळ सध्या राहणार साबळे मळा, आळे, मूळ मोरोशी, ता. मुरबाड, जि. ठाणे व प्रफुल्ल इंगळे सध्या राहणार आळेफाटा, वडगाव आनंद, मुळ राहणार मोहला, ता. अकोट, जि. अकोला. हे दोघे ओझर येथील गणपती दर्शन करून त्यांच्या स्प्लेंडर या दुचाकीवरून आळेफाटा दिशेने येत असताना चाळकवाडी येथील चारंगबाबा हॉटेलच्या पाठीमागे रस्त्याच्या कडेला असलेल्या सिमेंट ब्लॉकला धडकले.

# पुणे पोलिसांना आत्मपरीक्षणाची गरज

## भाजप कार्यकर्त्याला मारहाण झाल्यानंतर मुरलीधर मोहोळ संतापले

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातील कोथरूडमध्ये भाजप कार्यकर्त्याला झालेल्या मारहाणीच्या घटनेने शहरात खळबळ उडवली आहे. या घटनेवर केंद्रीय हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पुणे पोलिसांवर जोरदार टीका केली असून, "पोलिस आयुक्तांनी आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे," असा संताप व्यक्त केला आहे. तसेच, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत चर्चा झाली असून पोलिसांनी कडक भूमिका घ्यावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या स्वागतासाठी पुणे विमानतळावर आलेल्या मुरलीधर मोहोळ यांनी पत्रकारांशी संवाद साधला. पुण्यातील



गुन्हेगारी वाढत असल्याचे नमूद करत त्यांनी पोलिसांवर संताप व्यक्त केला.

"नागरिक, कार्यकर्ते आणि अगदी पोलिसांवरही हल्ले होत असतील, तर हे गंभीर आहे. पुणे पोलिस आयुक्तांनी यावर गांभीर्याने विचार करावा. आमच्या शहरात अशा प्रकारची गुन्हेगारी खपवून घेतली जाणार नाही," असा इशारा मोहोळ यांनी दिला.

या प्रकरणी भाजपचे आमदार चंद्रकांत पाटील यांनीही प्रतिक्रिया दिली असून, त्यांनी जखमी देवेंद्र पुरुषोत्तम जोग यांची घरी जाऊन भेट घेतली. कार्यकर्त्यांवर होणाऱ्या हल्ल्यांना प्रतिबंध घालण्यासाठी कडक पावले उचलावीत, अशी मागणी त्यांनी केली.

बुधवारी (ता. १९) सायंकाळी कोथरूडमध्ये भाजप कार्यकर्ता देवेंद्र जोग यांच्यावर तीन सराईत गुन्हेगारांनी हल्ला केला. गर्दीतून दुचाकी काढण्याच्या वादातून या हल्ल्याचा प्रकार घडला. याप्रकरणी ओम तीर्थराम धर्मजिज्ञासू (३५), किरण कोंडिबा पडवळ (३१) आणि अमोल विनायक तापकीर (३५) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी दुपारी भेलकेनगर परिसरात शिवजयंतीनिमित्त मिरवणूक काढण्यात आली होती. त्याच वेळी, जोग हे खरेदीसाठी घराबाहेर पडले होते. मिरवणुकीतील गर्दीतून दुचाकी काढताना वाद झाला आणि त्यानंतर तीन गुन्हेगारांनी त्यांच्यावर हल्ला केला.

हल्ल्यानंतर पुणे पोलिसांनी त्वरित कारवाई करत तिघा संशयितांना अटक केली. न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

या घटनेनंतर पुण्यातील कायदा-सुव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. शहरात गुन्हेगारी वाढत असून, गुन्हेगार खुलेआम हल्ले करत आहेत, ही चिंतेची बाब असल्याचे मोहोळ यांनी स्पष्ट केले.

या घटनेनंतर भाजप नेत्यांनी पोलिस प्रशासनाला कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच, शहरातील गुन्हेगारी नियंत्रणात आणण्यासाठी अधिक कठोर उपाययोजना राबवण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

## कोथरूडमध्ये संगणक अभियंता तरुणाला बेदम मारहाण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कोथरुड येथे रस्त्यावरील गर्दीतुन वाट काढण्याचा प्रयत्न करणाऱ्या दुचाकीस्वार संगणक अभियंत्यास तीन सराईत गुन्हेगारांनी बेदम मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी कोथरुडमधील तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने आरोपींना २४ फेब्रुवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. दरम्यान, मारहाण झालेला तरुण हा भाजपचा कार्यकर्ता आहे, तर त्यास मारहाण करणारे तिघेही कोथरुडमधील एका गुंड टोळीतील सराईत गुन्हेगार आहेत. ही घटना बुधवारी सायंकाळी घडली.

देवेंद्र पुरुषोत्तम जोग (वय ३३, रा. कोथरूड) असे जखमी झालेल्या संगणक अभियंत्याचे नाव आहे. तर, ओम तीर्थराम धर्मजिज्ञासू ( वय ३५, रा.शिंदे चाळ , संजय चौक शास्त्रीनगर, कोथरूड), किरण कोंडीबा पडवळ ( वय ३१, रा. शेख चाळ, शास्त्रीनगर, कोथरूड), अमोल विनायक तापकीर (वय ३५, रा. लालबहाद्दूर शास्त्री कॉलनी, शास्त्रीनगर, कोथरूड) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. जोग यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तिघांना अटक करण्यात आली आहे. आरोपींविरुद्ध मारहाणीसह खुनाच्या प्रयत्नाचे कलम पोलिसांनी लावले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कोथरूड भागातील भेलकेनगर परिसरात बुधवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास श्री शिवजयंतीनिमित्त मिरवणुक काढण्यात आली होती. त्या दिवशी जोग यांना सुट्टी असल्याने ते आपल्या दुचाकीवरुन खरेदीसाठी घराबाहेर पडले होते. खरेदी झाल्यानंतर ते पुन्हा घरी येत होते. त्यावेळी समोरुन मिरवणुक येत होती. त्यावेळी रस्त्यावरील गर्दीतुन वाट काढत जोग त्यांची दुचाकी पुढे नेत होते. त्याचवेळी तिघांनी त्यांना अडविले. "तुला नीट दुचाकी चालविता येत नाही का ?' अशा शब्दात त्यांना दमदाटी करून तिघांनी बेदम मारहाण केली. या घटनेत नाकावर ठोसा बसल्याने जोग गंभीर जखमी झाले.

## 'इसरो'चे माजी अध्यक्ष के. सिवन यांना जीवनगौरव पुरस्कार

- **सोमवारी (ता. २४) आर्मी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचा ३१ वा स्थापना दिवस**
- **लष्कराच्या दक्षिण मुख्यालयाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल धीरज सेठ प्रमुख पाहुणे**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आर्मी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एआयटी) या संस्थेचा ३१ व्या दिवसानिमित्त दिला जाणारा जीवनगौरव पुरस्कार भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे (इसरो) माजी अध्यक्ष डॉ. के. सिवन यांना प्रदान करण्यात येणार आहे. तसेच 'द सक्सेसफुल यंग आंत्रप्रेन्युअर पुरस्कार' २००२ च्या तुकडीचे माजी विद्यार्थी प्रीतपालसिंग यांना दिला जाणार आहे. लष्कराच्या दक्षिण मुख्यालयाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल धीरज सेठ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून, हा



समारंभ येत्या सोमवारी (ता. २४) दुपारी ४.४५ वाजता रमण सभागृह, एआयटी दिघी कॅम्पस, पुणे येथे होणार आहे.

स्थापना दिनानिमित्त सीओएएस अष्टपैलू विद्यार्थी फिरता करंडक, सर्वोत्कृष्ट नवकल्पनेसाठी देण्यात येणारी राजपूत रेजिमेंट ट्रॉफी, 'जीओसी इन सी' सर्वोत्कृष्ट विद्यार्थिनी पुरस्कार, सर्वोत्कृष्ट विद्यार्थी क्रीडापटूसाठी राजशेखर ट्रॉफी, सर्वोत्कृष्ट संशोधन, सल्लासेवा, अध्यापन तसेच शिक्षकेतर उत्तम कार्यासाठीही



पुरस्कार दिले जाणार आहेत. 'एआयटी' ही निवासी स्वरुपाची संस्था असून, ३० एकरांच्या निसर्गरम्य परिसरात वसली आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीचे ध्येय साध्य करण्यासाठी संस्थेत अनेक क्लब्ज, अभ्यासक्रमाला पूरक उपक्रम चालवले जातात. संस्थेचे पुणे विभागात बेस्ट प्लेसमेंटचे रेकार्ड आहे. दरवर्षी मायक्रोसॉफ्ट, गूगल, अमेझॉन, मास्टरकार्ड, बीएनवाय मेलन, डाईश इंडिया, लार्सन अंड टुब्रो, गोदरेज अशा बहुराष्ट्रीय कंपन्यांमधून संस्थेचे विद्यार्थी प्लेसमेंट मिळवत आहेत, अशी माहिती 'एआयटी'चे संचालक ब्रिगेडियर (नि.) अभय भट यांनी दिली.

आर्मी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीची (एआयटी) स्थापना तत्कालीन लष्करप्रमुख जनरल बी. सी. जोशी यांच्या दूरदर्शी नेतृत्वातून झाली. लष्कराच्या सर्व शाखांमध्ये कार्यरत असणाऱ्या युवांसाठी अभियांत्रिकी पदवीचे रीतसर शिक्षण गरजेचे असल्याचे हेरून, सुरवातीला संगणक अभियांत्रिकी, इलेक्ट्रानिक्स अँड टेलिकम्यूनिकेशन इंजिनिअरिंग आणि मेकॅनिकल इंजिनिअरिंग, अशा तीन विद्याशाखांचे पदवी शिक्षण १९९४ मध्ये सुरू झाले. तेव्हा प्रत्येक विद्याशाखेची प्रवेशक्षमता ६० विद्यार्थी इतकी होती. आज एआयटीमध्ये एकूण पाच विद्याशाखांमध्ये प्रत्येकी ४८० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संगणक, आयटी, इलेक्ट्रानिक्स अंड टेलिकम्यूनिकेशन, मेकॅनिकल आणि ऑटोमेशन व रोबोटिक्स, अशा पाच विद्याशाखा सुरू असून, याशिवाय डाटा सायन्स या विषयात पदव्युत्तर पदवीची सोयही आहे, असेही त्यांनी नमूद केले.

# सुनियोजित व सुंदर शहरांसाठी 'डिझाईन' महत्त्वपूर्ण

## माधुरी मिसाळ यांचे प्रतिपादन; व्हीके ग्रुप आयोजित 'व्हीकलेक्टिव्ह' प्रदर्शनाचे व शहरीकरणावर चर्चासत्राचे उद्घाटन

**पुणे (दै. आरंभ पर्व) :** "पुणे शहर वेगाने विकसित होण्यासह सर्वच दिशांनी विस्तारत आहे. त्यामुळे नगरनियोजनासोबत शहरातील बांधकामांचे, सार्वजनिक तसेच खासगी आस्थापनांचे डिझाईन अतिशय महत्त्वाचे आहे. शहर नियोजन आणि डिझाईन या संदर्भातील प्रयत्नांना राज्य सरकार पाठिंबा देईल," असे प्रतिपादन राज्याच्या नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी केले.

आर्किटेक्चर, एन्व्हायर्नमेंट, इंटेरियर डिझाईन, टाऊन प्लॅनिंग व अर्बन डिझाईन क्षेत्रात कार्यरत पुण्यातील व्हीके ग्रुपच्या वतीने ५१ व्या वर्षपूर्तीनिमित्त आयोजित 'व्हीकलेक्टिव्ह-बिल्डिंग द सिटी वि कॉल होम' या तीन दिवसीय प्रदर्शनाचे उद्घाटन माधुरी मिसाळ यांच्या हस्ते झाले. घोले रस्त्यावरील पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक केंद्रात झालेल्या कार्यक्रमात आमदार




सिद्धार्थ शिरोळे, व्हीके ग्रुपचे संस्थापक विश्वास कुलकर्णी, व्यवस्थापकीय संचालक ऋषिकेश कुलकर्णी, अनघा परांजपे-पुरोहित, अपूर्वा कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी मगरपट्टा सिटी कॉर्पोरेशनचे प्रतीक मगर, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रमोद रावत, पीएनजी ज्वेलर्सचे व्यवस्थापकीय संचालक सौरभ गाडगीळ, सवाई गंधर्व महोत्सवाचे संचालक मुकुंद संगोराम व केपीआयटी कमिन्सचे रवी पंडित यांना 'लीडर्स ऑफ चेंज'ने सन्मानित करण्यात आले. राजा रवी वर्मा आर्ट गॅलरीत व्हीके ग्रुपने गेल्या ५० वर्षांत साकारलेल्या आकर्षक, नाविन्यपूर्ण व वास्तुकलेच्या डिझाईन्स व प्रकल्पाच्या संग्रहाचे प्रदर्शन पाहण्याची संधी पुणेकरांना यानिमित्ताने मिळणार आहे.

माधुरी मिसाळ म्हणाल्या, "पुण्याची परंपरा मोठी आणि अभिमानास्पद आहे. मात्र, आधुनिक काळात पुणे शहराचे नव्याने नियोजन करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी डिझाईनचे महत्त्व आहे. सर्व दिशांनी सतत वेगाने विस्तारणारे आपले शहर वाहतुकीच्या समस्येनेही ग्रासले आहे. शहराचा विस्तार होताना बांधकाम, नियोजन आणि डिझाईन, यांचा विचार प्राधान्याने झाला पाहिजे. शहराचे काही क्लस्टर विभाजन करणे आवश्यक आहे. त्यातून शहराचे सौंदर्य टिकून राहण्यास साह्य मिळेल, असा मार्ग आर्किटेक्ट असोसिएशन आणि अन्य घटकांनी मिळून काढला पाहिजे."

"व्हीके ग्रुपच्या माध्यमातून गेली ५० वर्षे सातत्याने पुण्यासह इतरत्रही उत्तम दर्जाच्या इमारती, आरेखन, पर्यावरणपूरक बांधकामे असे कार्य सातत्याने सुरू आहे. सलग पाच दशके असे योगदान देणे, ही महत्त्वाची बाब असून, त्यासाठी व्हीके ग्रुप अभिनंदनास पात्र आहे. आज इथे सन्मानित विविध क्षेत्रातील मान्यवर पुणेकरांचे 'कलेक्शन' सादर केले आहे. पुण्याच्या सर्वांगीण विकासात त्यांचे योगदान मोलाचे राहिले आहे," अशा शब्दात माधुरी मिसाळ यांनी कौतुक केले.

'पुणे हे सर्व क्षेत्रांत अतुलनीय भरारी घेणाऱ्या प्रतिभावंतांचे शहर आहे. पुणेकरांनीच शहर आणि शहराचे कर्तृत्व वाढवले व उंचावले आहे,' असे मुकुंद संगोराम यांनी, तर 'सध्या नियोजन बाजूला ठेवून अफाट एफएसआय दिला जात असल्याने शहराचे मूळ सौंदर्य आणि आटोपशीरपणा नष्ट झाला असून, शहराची चुकीच्या पद्धतीने होणारी वाढ थांबवण्याबाबत विचार करावा, असे प्रमोद रावत यांनी नमूद केले. अपूर्वा कुलकर्णी यांनी मानपत्रांचे वाचन केले. विजय साने यांनी प्रास्ताविक केले. मीनल पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

**भविष्यातील शहरांवर चर्चा :** 'बिल्डिंग द सिटी ऑफ टुमारो' या विषयावरील चर्चासत्र कार्यक्रमाच्या उत्तरार्धात झाले. त्यामध्ये 'क्रेडाई'चे अध्यक्ष रणजित नाईकनवरे, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्ट्सच्या पुणे चॅप्टरचे चेअरमन विकास अचलकर, पर्सिस्टंट सिस्टीम्सचे मुख्य प्रशासकीय अधिकारी जयंत कोंडे, एमसीसीआयएच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य विवेक साधले, ब्रिक्सच्या संस्थापिका पूजा मिसाळ, व्हीके ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक आर्कि. हृषीकेश कुलकर्णी सहभागी झाले होते.



# २७ वर्षांनंतर दिल्लीत भाजपाचे सरकार

दिल्लीच्या नवव्या मुख्यमंत्री म्हणून भाजपाच्या रेखा गुप्ता यांनी गुरुवारी शपथ घेतली. तब्बल २७ वर्षांनंतर दिल्लीत भाजपाचे सरकार स्थापन झाले. भाजपाच्या सुषमा स्वराज यांच्या नेतृत्वाखालील सरकार काँग्रेसने हटवले व शीला दीक्षित पंधरा वर्षे मुख्यमंत्री राहिल्या. नंतर काँग्रेसचे सरकार 'आप'ने हटवले व अरविंद केजरीवाल व शेवटचे काही महिने आतिशी मुख्यमंत्री राहिल्या. यावर्षी ८ फेब्रुवारीला दिल्ली विधानसभा निवडणुकीचा निकाल लागला व भाजपाला निर्विवाद बहुमत प्राप्त झाले. दोन तृतियांशपेक्षा जास्त जागा भाजपाने जिंकल्या. मोदींची लोकप्रियता, करिष्मा सर्वश्रेष्ठ असल्याचे निकालाने सिद्ध केले. मोदींच्या जादूने कमाल केली आणि केंद्रात हटट्रीक संपादन करणाऱ्या भाजपाने दिल्लीतही कमळ फुलवले. देशभरात २१ राज्यांत आता भाजपा सत्तेवर आहे, हा सुद्धा मोठा विक्रम आहे.

दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर सरकार स्थापन व्हायला बारा दिवस लागले. दिल्लीची सत्ता भाजपाला मिळाली पण दिल्लीचा मुख्यमंत्री कोण होणार याची संपूर्ण देशाला उत्सुकता होती. दिल्लीच्या निवडणुकीत भाजपाने मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार जाहीर केला नव्हता. त्यामुळे केजरीवाल यांच्यानंतर दिल्लीचा मुख्यमंत्री कोण यावर अनेक तर्क-वितर्क प्रकट झाले. पण भाजपा श्रेष्ठींनी रेखा गुप्ता यांची या पदासाठी निवड करून आश्चर्याचा धक्का दिलाच पण पक्ष संघटना व कार्यकर्त्यांना यांना आपण महत्त्व देतो हे पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा व पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी सर्व देशाला दाखवून दिले. रेखा गुप्ता दिल्लीच्या चौथ्या महिला मुख्यमंत्री आहेत. सुषमा स्वराज, शीला दीक्षित आणि आतिशी यांच्यानंतर हा मान त्यांना मिळाला आहे. सुषमा स्वराज व आतिशी यांना मुख्यंमत्रीपदावर राहण्याची संधी अल्पकाळ मिळाली होती. तर शीला दीक्षित या सलग तीन टर्म मुख्यमंत्री होत्या. रेखा गुप्ता यांची मुख्यमंत्रीपदासाठी निवड



करताना पक्ष श्रेष्ठींनी निवडून आलेल्या दिग्गजांची नावे बाजूला ठेवली हेही लक्षात घेण्यासारखे आहे. रेखा गुप्ता या संघ परिवाराच्या संस्कारातूनच पुढे आल्या. विद्यार्थी असताना त्या अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे झोकून काम करीत असायच्या. त्यांना कोणतीही राजकीय कौटुंबिक पार्श्वभूमी नाही. राजकीय घराणेशाहीचा आरोप त्यांच्यावर चुकूनही कोणाला करता येणार नाही. सार्वजनिक जीवनात काम करणारी मध्यमवर्गीय गृहिणी म्हणजे रेखा गुप्ता हीच त्यांची दिल्लीतील प्रतिमा आहे. वाजपेयी-अडवाणींच्या काळापासून त्या पक्ष संघटनेत सक्रिय आहेत. त्यांचा राजकीय प्रवास म्हणजे पक्ष निष्ठा, इमानदारी व कार्यक्षमता सिद्ध करणारा आहे.

शालिमार बाग मतदारसंघातून प्रथमच आमदार झालेल्या ५० वर्षीय रेखा गुप्ता यांचे सर्वसामान्य जनतेतूनही उत्स्फूर्त स्वागत झालेले बघायला मिळाले. विधानसभा निवडणूक काळात मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान म्हणून ओळखला जाणारा शीशमहाल खूप गाजला होता. शीशमहालच्या नूतनीकरणावर आप सरकारने ४५ कोटी खर्च केल्याचा आरोप भाजपाने केला होता. शीशमहाल हे भ्रष्टाचाराचे प्रतीक बनले होते. मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर रेखा गुप्ता यांनी आपण वादग्रस्त शीशमहालमध्ये राहायला जाणार नाही असे जाहीर करून टाकले व त्याचे दिल्लीकरांनी कौतुकही केले. त्या म्हणाल्या-माझ्यावर पंतप्रधान मोदी व पक्षाच्या हायकमांडने जो विश्वास दाखवला त्याबद्दल मी त्यांचे आभार मानते. मी कधीच विचार केला नव्हता की मी दिल्लीची मुख्यमंत्री होईन, पण मी त्या काचेच्या महालात राहायला जाणार नाही. रेखा गुप्ता या उच्चशिक्षित असून पेशाने वकील आहेत. एनडीएच्या त्या एकमेव महिला मुख्यमंत्री आहेत. त्यांनी कॉलेज जीवनात दिल्ली विद्यापीठ विद्यार्थी संघाचे सचिव म्हणून काम केले. भाजपा युवा मोर्चा दिल्लीच्या त्या सचिव होत्या, पीतमपुरा व शालिमार बाग प्रभागातून त्या तीन वेळा नगरसेवक म्हणून निवडून आल्या, दिल्ली प्रदेश महिला मोर्चाच्या त्या सरचिटणीस होत्या, भाजपाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीवर सदस्य होत्या. संघटनेचा त्यांना मोठा अनुभव आहे, त्याच कामाची पावती म्हणून श्रेष्ठींनी त्यांच्यावर दिल्लीचे मुख्यमंत्री म्हणून सेवा करण्याची जबाबदारी सोपवली. शालिमार बाग मतदारसंघातून यंदा त्यांनी आप व काँग्रेस अशा दोन्ही उमेदवारांचा पराभव करून २९,५९५ मतांनी विजय मिळवला ही सुद्धा त्यांची जमेची बाजू आहे. शीला दीक्षित किंवा अरविंद केजरीवाल हे दोन्ही मुख्यमंत्री नवी दिल्ली मतदारसंघाने दिले होते. रेखा गुप्ता मात्र शालिमार बागमधून निवडून आल्या आहेत. यंदाच्या निवडणुकीत नवी दिल्ली मतदारसंघातून भाजपाचे प्रवेश वर्मा यांनी अरविंद केजरीवाल यांचा नवी दिल्ली मतदारसंघात दणदणीत पराभव केला. प्रवेश यांचे वडील साहबसिंह वर्मा हे दिल्लीचे भाजपाचे मुख्यमंत्री होते. प्रवेश यांनी केजरीवाल यांचा पराभव केल्याने त्यांना मीडियाने जायंट किलर अशी मोठी प्रसिद्धी दिली. तेच मुख्यमंत्री होतील असे अंदाजही व्यक्त झाले. खरं तर दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत पक्षाचे सहा दिग्गज नेते होते. पण मोदी-शहांनी रेखा गुप्ता या प्रसिद्धीपासून दूर असलेल्या महिला कार्यकर्तीची निवड केली व भाजपा महिला सक्षमीकरणाला कसे प्राधान्य देते हा त्यातून संदेश दिला. दिल्लीच्या ऐतिहासिक रामलीला मैदानावर झालेल्या शानदार शपथविधी सोहळ्यास स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तसेच देशातील भाजपाचे मुख्यमंत्री आणि एनडीएचे उपमुख्यमंत्री आवर्जून हजर होते. भाजपाचे सरकार दिल्लीत स्थापन झाले तरी आम्ही एनडीएला बरोबर घेऊन कारभार चालवत आहोत, असा विश्वास भाजपाने सर्व मित्रपक्षांना दिला आहे. दिल्लीकर जनतेने भाजपाला प्रचंड बहुमत देऊन दिल्लीची सत्ता दिली आहे म्हणूनच दिल्लीकरांच्या अपेक्षाही उंचावल्या आहेत.

# विश्वराज हॉस्पिटल येथे अत्याधुनिक एमआरआय सेवांचे उद्घाटन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

लोणी येथील विश्वराज हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक एमआरआय सेवांचे आज उद्घाटन करण्यात आले. संचेती हॉस्पिटलचे अध्यक्ष व प्रख्यात अस्थिरोग शल्यचिकित्सक डॉ.पराग संचेती,महाराष्ट्र आर्थोपेडिक असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.नारायण कर्णे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते,तर माईर्स एमआयटी - डब्ल्यूपीयूच्या विश्वस्त मंडळाच्या सदस्य,सह सरसचिव व विश्वराज हॉस्पिटलच्या कार्यकारी संचालक डॉ.आदिती कराड विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या. याप्रसंगी विश्वराज हॉस्पिटल येथील रेडिओलॉजी विभागाचे प्रमुख डॉ.अजितेय ताम्हाणे,अस्थिरोग तज्ञ डॉ प्रमोद सुर्वे, डॉ.रामप्रसाद धरनगुट्टी व सहाय्यक व्यवस्थापक



डॉ तबरेज पठाण,वैद्यकीय अधिक्षक डॉ.सचिन कातकडे, आर्थोपेडिक सर्जन डॉ.संपत डुंबरे-पाटील,डॉ सचिन आबणे आदी मान्यवर उपस्थित होते. उद्घाटन समारंभानंतर सीएमईचे आयोजन करण्यात आले होते. यात डॉ.पराग संचेती यांनी गुडघ्यातील ऑस्टियोआर्थरायटिसच्या समस्या आणि या क्षेत्रात सध्याच्या काळात झालेली प्रगती या विषयावर सादरीकरण केले.

याप्रसंगी बोलताना संचेती हॉस्पिटलचे अध्यक्ष व प्रख्यात अस्थिरोग शल्यचिकित्सक डॉ.पराग संचेती म्हणाले की, विश्वराज हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक रेडिओलॉजीचे उद्घाटन करताना मला खूप आनंद होत आहे.

एमआरआय स्कॅन मुळे हाडांच्या भोवती असणारे स्नायू,अस्थिबंधन,उतींना झालेली दुखापत याची आतील तपशीलवार माहिती घेऊन समस्या शोधता येते. अचूक निदान केल्यामुळे रूग्णावर करण्यात येणारी उपचार प्रक्रिया सोपी होऊ शकते. कंबरेच्या,गुडघ्याच्या,मानेच्या विकारांसाठी एमआरआय मध्ये मिळालेल्या अचूक माहितीमुळे रुग्णांवर योग्य ते उपचार करू शकतो.

महाराष्ट्र आर्थोपेडिक असोसिएशनचे प्रेसिडेंट इलेक्ट डॉ.नारायण कर्णे म्हणाले की, या अत्याधुनिक सुविधांमुळे हडपसर व आसपासच्या परिसरातील नागरिकांना उपचार मिळण्यात मदत होईल.

विश्वराज हॉस्पिटल येथील रेडिओलॉजी विभागाचे प्रमुख डॉ.अजितेय ताम्हाणे म्हणाले की, या अत्याधुनिक एमआरआय उपकरणामुळे प्रतिमांमध्ये अधिक स्पष्टता व निदानामध्ये अचूकता साधता येणार आहे. स्कॅन प्रक्रियेला तुलनेने कमी वेळ लागत असल्याने रूग्णांसाठी ही सेवा अतिशय सुलभ होईल. अत्याधुनिक उपकरण असल्यामुळे शरीरातील असामान्य बाबी अधिक स्पष्टतेने दिसून येतात,ज्यामुळे निदान आणि उपचाराचे परिणाम चांगले दिसून येतात.

# हिंदुस्थान पेट्रोलियम : सक्षम महोत्सव जाहीर

- **14 ते 28 फेब्रुवारी 2025 दरम्यान संपूर्ण देशभर महोत्सव साजरा होणार**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (भारत सरकारचा उपक्रम) च्या वतीने 2025 साठी संरक्षण क्षमता महोत्सव (सक्षम योजना ) जाहीर करण्यात आली आहे. या योजनेची सविस्तर माहिती हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडचे जिल्हा नियोजन अधिकारी प्रसाद सावजी, ऑइल इंडिया पेट्रोल डीलर्स असोसिएशनचे प्रवक्ते अली दारुवाला यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रसाद सावजी म्हणाले, "दरवर्षी हा महोत्सव घेण्यात येतो. या महोत्सवातील 15 दिवसात विविध उपक्रम यामध्ये राबवले जाणार आहे. यात 23 फेब्रुवारी 2025 रोजी पुण्यात पिंपरी चिंचवड येथे सायकलो थ्रोनचे आयोजन करण्यात आले आहे. या व्यतिरिक्त विविध महाविद्यालयात तसेच शालेय विद्यार्थ्यांसाठी गट चर्चा, महाविद्यालयांमध्ये भिंतीचित्र स्पर्धा, इंधन कार्यक्षम ड्रायव्हिंग स्पर्धा, लेखन, पत्रकार परिषदा आणि टीव्ही/रेडिओवरील टॉक शो असे विविध उपक्रम राबवले जाणार आहे. संपूर्ण देशभर चालणाऱ्या या महोत्सवाचे टॅगलाइन "ग्रीन अँड क्लीन एनर्जीद्वारे क्लीन एन्व्हायर्नमेंट" (हरित आणि स्वच्छ ऊर्जेचे अंगिकार करा आणि पर्यावरणास स्वच्छ बनवा) असे आहे . १४ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता वाय, बी चव्हाण सेंटर, रंगस्वर हॉल, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०००२१ येथे उद्घाटन समारंभा होणार आहे. पेट्रोलियम उत्पादनांच्या संवर्धनासाठी, इंधन कार्यक्षम उपकरणांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि पेट्रोलियम संवर्धनासाठी धोरणे आणि धोरणे प्रस्तावित करण्यात सरकारला मदत करण्यासाठी तेल विपणन कंपन्या (ओएमसी) आघाडीवर आहेत".

# मानसिक, बौद्धिक व शारिरीकदृष्ट्या सक्षम व्हावे - गुरव

**किरण खुडे**

- **राजगुरू महाविद्यालयात निर्भय कन्या अभियान**



**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

विद्यार्थिनींनी स्वतःमधील क्षमता ओळखून निर्णय घेणे व जबाबदारी घ्यायला हवी त्यासाठी त्यांनी मानसिक, बौद्धिक व शारीरिक दृष्टीने सक्षम असणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन खेड पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक स्नेहल गुरव यांनी केले. त्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व विद्यार्थी विकास मंडळ हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि.२१) आयोजित एकदिवसीय निर्भय कन्या अभियानात स्त्री हक्क-अधिकार विषयक नियम संहिता कायदे या विषयावर बोलत होत्या.

याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, कराटे प्रशिक्षिका काजल बोऱ्हाडे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. संदीप थोरात आणि सर्व महिला प्राध्यापिका व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

सहाय्यक पोलीस निरीक्षक स्नेहल गुरव पुढे म्हणाल्या की, विद्यार्थिनींना कोणत्याही अन्याय, अत्याचार किंवा दबावाला बळी न पडता आपल्या शारीरिक, मानसिक, भावनिक क्षमतांचा विकास करून निर्भयपणे वाटचाल करायला हवी. महिलांसाठी असणाऱ्या कायद्यांविषयी जागृत राहून योग्य निर्णय घ्यायला हवा. विद्यार्थिनींनी जीवनाची नीतिमूल्ये न विसरता आपल्या कुटुंबाला अभिमान वाटेल अशी कामगिरी करावी. कायद्याचा गैरवापर करू नये, असेही त्यांनी सांगितले. कॉलेज संपल्यानंतर आयुष्याच्या खरा पेपरला सुरुवात होणार आहे. त्यासाठी स्वतःमधील क्षमता ओळखून निर्णय घेऊन जबाबदारी घ्यायचे आवाहन त्यांनी केले. त्यांनी निर्भया पथक, भरोसा सेल, सायबर फ्रॉड, पोलीस दिदी या उपक्रमाविषयी माहिती दिली.

संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी विद्यार्थिनींना निर्भय होण्याची मानसिकता जपण्याचे आवाहन केले. प्राचार्य डॉ. पिंगळे यांनी विद्यार्थिनींना स्वतः:बद्दलचा आदर आणि चारित्र्य जपण्याचे आवाहन केले. कराटे प्रशिक्षिका काजल बोऱ्हाडे यांनी महिला स्वसंरक्षण या विषयावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले व स्वसंरक्षणासाठी कराटे प्रशिक्षणाची प्रात्याक्षिके सादर केली.

या अभियानात २४५ विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सोनल धानपुने, प्रास्ताविक प्रा. संदीप थोरात तर आभार डॉ.प्रतिमा लोणारी यांनी मानले.

# आईचे आगळेवेगळे पुण्यस्मरण

**नितीन गायकवाड**

- **प्रा. डॉ. सुरेश हनमंते यांचे समाजकार्य प्रेरणादायी**

**कर्वेनगर (दै. आरंभ पर्व)**

पारंपरिक रूढी-परंपरांना फाटा देत, आईच्या शिकवणीला अनुसरून आणि सामाजिक बांधिलकी जपत प्रा. डॉ. सुरेश श्रवणराव हनमंते यांनी आपल्या दिवंगत मातोश्री स्मृतिशेष शांताबाई श्रवणराव हनमंते यांच्या तेराव्या पुण्यस्मरणानिमित्त समाजोपयोगी काम केले आहे. समाजाच्या विविध घटकांना मदतीचा हात देणारे त्यांचे कार्य एक दिशादर्शक आहे.






दरवर्षी समाजच्या कल्याणासाठी दोन लाखांपर्यंतची मदत करणाऱ्या डॉ. हनमंते यांनी यावर्षी बोधिसत्व रुग्णालयाला रु.1,11,000 आणि अनाथ मुलांच्या शिक्षणासाठी कार्यरत संस्थेला ₹11,000 देणगी दिली. त्यांच्या या योगदानातून समाजातील दुर्बल घटकांसाठी एक नवा आशेचा किरण निर्माण झाला आहे.

त्यांच्या सेवाभावी कार्याचा विस्तार केवळ आर्थिक मदतीपुरता मर्यादित नाही. दरवर्षी ते विविध अनाथआश्रमांना दोन महिन्यांचा किराणा, औषधे आणि शैक्षणिक साहित्य पुरवतात. तसेच सामाजिक जागृतीसाठी 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथाच्या 1,000 प्रती आणि 'भारतीय संविधान' ग्रंथाच्या 500 प्रतींचे मोफत वाटप त्यांनी केले आहे.

डॉ. हनमंते यांचे समाजकार्य केवळ देणगीपुरते न थांबता आरोग्य आणि रक्तदान चळवळीच्या माध्यमातूनही समाजासाठी योगदान देत आहे. त्यांच्या 50व्या वाढदिवशी त्यांनी आपले 100वे रक्तदान केले. विशेष म्हणजे, त्याच दिवशी त्यांच्या लग्नाचा रौप्यमहोत्सवही होता, आणि त्या आनंददायी क्षणाचे औचित्य साधत त्यांनी रक्तदान शिबिर तसेच अन्नदानाचे आयोजन केले.

**सामाजिक बांधिलकीचा नवा दृष्टिकोन**

**डॉ. हनमंते यांचे हे कार्य समाजातील इतर दातृत्वशील व्यक्तींना प्रेरणा देणारे ठरत आहे. पुण्यतिथीला केवळ पारंपरिक विधी न करता समाजोपयोगी उपक्रमांनी आईची आठवण जपण्याचा त्यांचा हा उपक्रम निश्चितच एक नवा सामाजिक दृष्टिकोन घडवणारा आदर्श आहे.**

# थोडक्यात



## टिकळेश्वर देवस्थान परिसर उजळला!

**देवरुख (आरंभ पर्व) : देवस्थान परिसरातील ५० वर्षे प्रलंबित असलेले विद्युतीकरणाचे स्वप्न अखेर साकार झाले. आमदार शेखर निकम यांच्या अथक पाठपुराव्यामुळे हे महत्त्वपूर्ण कार्य मार्गी लागले आणि ४५ लाख रुपयांच्या निधीच्या माध्यमातून परिसरात येरझार विद्युतीकरण झाले. या उद्घाटन समारंभात ग्रामस्थ व भक्तगण मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते आणि या ऐतिहासिक क्षणी आपले समाधान व्यक्त केले. आमदार शेखर निकम यांनी या कार्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या निधीचे महत्त्व सांगितले आणि मान्यवरांचे आभार मानले. पालकमंत्री उदयजी सामंत तसेच महायूतीचे सर्व पदाधिकारी यांचे त्यांनी विशेष आभार व्यक्त केले, ज्यांच्या सहकार्याने या प्रकल्पाला गती मिळाली. आमदार शेखर निकम यांनी आपल्या मनोगतात देवस्थान परिसरातील लोकांच्या भावनांना आणि अपेक्षांना पूर्ण करण्यासाठी या विद्युतीकरणाच्या कार्याला एक नविन आशा आणि एकात्मतेचे प्रतीक मानले. या कार्याच्या माध्यमातून आपल्या भक्तांच्या सेवेत आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे. भविष्यात असाच विकास होईल आणि येथे अधिक चांगले कार्य होईल,असे त्यांनी सांगितले. टिकळेश्वर परिसराच्या ग्रामस्थांना आणि भक्तगणांना हे विद्युतीकरण एक नविन ऊर्जा देईल, असाच विश्वास त्यांना आहे. देवस्थानाच्या परिसरात आता रात्रीसुद्धा उज्ज्वलतेचा अनुभव घेता येईल, आणि हे सर्व भक्तांच्या एकजुटीचे आणि आमदार शेखर निकम यांच्या पाठपुराव्याचे प्रतिक आहे. यावेळी रोहनजी बने, बाळुशेठ ढवळे, वैभव पवार, नितिन भोसले, हुसेन बोबडे, मंगेश बांडागळे, राजा भेरे, बाळच्या भेरे, भिकाजी बुवा चौगुले, संतोष कतळकर, सुभाष भायजे, सुभाष भोबसकर, बापू बडवे, राजू वाणकुंद्रे, सहाय्यक अभियंता सतीश कोकरे, ठेकेदार राहुल टाकाळे आदी मान्यवर पदाधिकारी व कार्यकर्ते आणि भक्तगण उपस्थित होते.**

## खाजगी प्रवासी बसची धडक बसल्याने तरुणाचा मृत्यू

**राजगुरुनगर-किरण खुडे (आरंभ पर्व) : राजगुरुनगर येथील पुणे-नाशिक महामार्गावरील शहरालगतच्या बाह्यवळणावर खाजगी प्रवासी बसची धडक बसल्याने एका कंपनी कामगाराचा मृत्यू झाला. ही घटना सोमवारी (दि. १७) पहाटे साडेपाच वाजण्याच्या सुमारास घडली. शंकर बबन काळे (वय ३५, मूळ रा. दावडी, सध्या रा. चव्हाणमळा, राजगुरुनगर) असे मृत्युमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे. खेड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शंकर काळे हे चाकण येथे एका कंपनीत कामाला होते. सोमवारी सकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास कंपनीत कामावर जाण्यासाठी ते बाहेर पडले. येथील पुणे- नाशिक महामार्गाच्या बाह्यवळणावरील वाफगावकडे जाणाऱ्या पुलाच्या सेवा रस्त्यावर मोटारसायकल उभी करून ते महामार्ग ओलांडत होते. तेव्हा नाशिक बाजूकडून येणाऱ्या भरधाव खाजगी प्रवासी बसची (क्र. एम.एच.१९, सी.वाय. ६६६१) त्यांना धडक बसली. त्यामुळे ते गंभीर जखमी झाले. चांडोली ग्रामीण रुग्णालयात दाखल केल्यानंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. अपघात झाल्यानंतर बस चालकाने बस तशीच चाकणच्या दिशेने भरधाव वेगाने नेली. महामार्गावरच्या इतर वाहन चालकांनी पाठलाग करून त्यास चाकण येथे पकडले व खेड पोलिस ठाण्यात आणले. एकनाथ राजाराम माळी (वय ४७, रा. खरडई, ता. शिरपूर, जि. धुळे) असे बस चालकाचे नाव आहे. खेड पोलिसांनी त्याच्यावर गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.**

## आमदार शेखर निकम यांनी केली गाळ काढण्याच्या कामाची केली पाहणी

**संगमेश्वर (आरंभ पर्व) : माखजन बाजारपेठ ते गडनदी विसर्जन घाट नदी पात्रातील गाळ काढण्याचे काम सध्या सुरु आहे. माखजन बाजारपेठ येथे आमदार शेखर निकम यांनी भेट देवून ग्रामस्थांसोबत गाळ काढण्याच्या कामाची पाहणी केली. संगमेश्वर तालुक्यातील गडनदीला प्रतिवर्षी येणाऱ्या पुरामुळे माखजन बाजारपेठ येथे पुराचे पाणी शिरते. गेली अनेक वर्षे नदी पात्रातील गाळ न काढल्याने पुराचे पाणी बाजरपेठेत शिरत असल्याने व्यापार्यांचे व ग्रामस्थांचे फार मोठ्या प्रमाणावर नुकसान होत होते. व्यापारी व ग्रामस्थ यांनी आमदार शेखर निकम यांची भेट घेवून यावर उपाययोजना करण्याची मागणी केली होती. त्यानुसार आमदार निकम यांनी जिल्हा वार्षिक पूर नियंत्रण योजनेंतर्गत माखजन बाजारपेठ ते गडनदी विसर्जन घाट नदी पात्रातील गाळ काढण्यासाठी निधी उपलबद्ध करून दिला. नदी पात्रातील गाळ काढण्याच्या या कामाबाबत आमदार शेखर निकम यांनी संबंधीत अधिकारी व ग्रामस्थ यांच्याशी चर्चा करून काही सुचना केल्या.**

# परीक्षेला सामोरे जाताना : विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी चर्चासत्र!



**कोथरूड (दै. आरंभ पर्व)**

परीक्षा फक्त ज्ञानाची कसोटी नसून आत्मविश्वास, मानसिक स्थैर्य आणि योग्य नियोजनाचीही परीक्षा असते! या विचारातूनच कडक मिसळ, श्री साई एज्युकेशन ट्रस्ट, मातोश्री भेळ आणि मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "परीक्षेला सामोरे जाताना" या चर्चासत्राला विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा भरघोस प्रतिसाद लाभला.

विद्यार्थ्यांच्या परीक्षेतील यशासाठी प्रभावी तयारी, तणावमुक्त अभ्यास पद्धती, वेळेचे नियोजन आणि मानसिक संतुलन याविषयी तज्ज्ञांनी मोलाचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी यशस्वी रणनीती, आत्मविश्वास वाढवण्याची तंत्रे आणि तणावमुक्त अभ्यास करण्याचे विविध उपाय शिकता आले. विशेषतः स्वतःवरील विश्वास, सकारात्मक दृष्टिकोन आणि नियमित सराव यावर भर देण्यात आला.

कार्यक्रमाला श्री. सोपान वांजळे, श्री. गिरीशभाऊ खत्री, श्री. अनंता (बाप्पू) सुतार, श्री. हरपुडे मामा, सौ. पल्लवी समीर गाडगीळ, सौ. अल्पनाताई गणेश वर्पे, सौ. आरती तेंडले, श्री. केतन तेंडले, श्री. संतोष उभे आदी मान्यवर उपस्थित होते.

या चर्चासत्राच्या यशस्वी आयोजनामध्ये श्री. योगेश पवार, सौ. मधुरा पवार, सौ. कोमल केळकर, श्री. महेश केळकर, श्री. लोकेश जैन, श्री. स्वप्निल राजपूत, श्री. विशाल गांगरकर, श्री. नागेश टकले, श्री. दत्ता निबुदे यांनी महत्त्वाचे योगदान दिले. कार्यक्रमाची प्रस्तावना श्री. योगेश पवार, सूत्रसंचालन श्री. कदू सर तर आभार प्रदर्शन श्री. स्वप्निल राजपूत यांनी मानले.

आयोजकांनी उपस्थित विद्यार्थी, पालक आणि मार्गदर्शकांचे आभार मानत, भविष्यातही असेच उपयुक्त आणि प्रेरणादायी कार्यक्रम आयोजित करण्यात येतील असे सांगितले.

विद्यार्थ्यांसाठी अभ्यासाचा ताण कमी करत, परीक्षेचा आत्मविश्वास वाढवणाऱ्या अशा उपक्रमांचे सतत आयोजन होणे गरजेचे आहे. तसेच "कडक मिसळ आणि मातोश्री भेळ आणि मित्र परिवार यांनी मुलांसाठी घेतलेला कार्यक्रम स्तुत्य होता, असे कार्यक्रम होणे ही काळाजी गरज आहे. समाजातील इतर व्यवसायिकांनी असेच पुढाकार घ्यावा, असे मत पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

### तज्ज्ञांचे बहुमोल मार्गदर्शन

इंग्रजी – प्रा. श्री. सागर शेडगे सर
विज्ञान – प्रा. श्री. श्रीकांत मोहोळ सर
गणित – प्रा. श्री. मनोज उल्हे सर
मानसिक आरोग्य, तणाव व्यवस्थापन, आहार आणि वेळेचे नियोजन – प्रा. सौ. अमृता देशपांडे मॅडम

## थोडक्यात



### शिवजयंती सोहळा उत्साहात साजरा

**कर्वेनगर (आरंभ पर्व) : सकल हिंदू समाजाचे आराध्य दैवत, युगपुरुष श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त दि. १८ फेब्रुवारी २०२५ रोजी आनंदीबाई कर्वे प्राथमिक शाळेत साजरी करण्यात आली. या सोहळ्यास हिंदू जागरण समितीच्या संभाजी भागाच्या सहसंयोजिका "मा. संजीवनी ताई चौधरी प्रमुख पाहुणे" म्हणून लाभल्या होत्या. पाहुण्यांच्या हस्ते शिवरायांच्या प्रतिमापूजनानंतर विद्यालयाच्या प्राचार्या मा. सुनंदाताई देशमुख यांनी प्रास्ताविक केले. यानंतर विद्यार्थिनींचे सादरीकरण घेण्यात आले. इ. १ली ते ४ थी शस्त्र चित्र काढून रंगवणे स्पर्धा व सादरीकरण. तसेच इ. ५ वी ते ७ वी तील विद्यार्थिनींनी शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित स्वातंत्र्यवीर सावरकर आणि चारुदत्त आफळे यांनी लिहिलेले पोवाडे साभिनय सादर केले. तसेच शाळेत शिवाजी महाराजांच्या जीवनातील प्रसंग रेखाटन या विषयावर आधारित चित्रकला स्पर्धा घेण्यात आली होती. त्याचा निकाल देखील कार्यक्रमादरम्यान जाहीर करण्यात आला. त्यानंतर मा. संजीवनी ताईंनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले व त्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमास मुख्याध्यापिका मा. सौ. सुनंदाताई देशमुख, सर्व शिक्षक वर्ग व इयत्ता १ ली ते ७ वी तील सर्व विद्यार्थिनी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा. सविता वेदपाठक यांनी केले.**




### हिंजवडी, पुणे येथे १०५ एकरचे इंटिग्रेटेड टाउनशिपचे अनावरण

**पुणे (आरंभ पर्व) : निरंजन हिरानंदानी समूहाने पुणे रिअल इस्टेट मार्केटमध्ये पदार्पण करत क्रिसाला डेव्हलपर्ससोबत १०५ एकरच्या संयुक्त विकास करारावर स्वाक्षरी केली आहे. हा प्रकल्प उत्तर हिंजवडी येथे असून, तो इंटिग्रेटेड टाउनशिप धोरणांतर्गत विकसित केला जाणार आहे. यात निवासी, व्यावसायिक आणि रिटेल डेव्हलपमेंटचा समावेश असेल. या संयुक्त विकासाअंतर्गत प्रथम टप्प्यात ३० एकर क्षेत्रात विकास केला जाणार असून, यामध्ये किमान ३ दशलक्ष चौरस फूट मालमत्ता उभारण्याची क्षमता आहे. या पहिल्या टप्प्यात सुमारे ₹५०० कोटींची गुंतवणूक अपेक्षित असून, एकूण महसूल सुमारे ₹२१०० कोटींच्या घरात राहील. या प्रकल्पात अपार्टमेंट्स, व्हिला प्लॉट्स, ब्रँडेड निवासस्थाने आणि निवासी सुविधांचा समावेश असेल, जे घरखरेदीदारांसाठी संपूर्ण जीवनशैलीचा अनुभव देतील. या धोरणात्मक संयुक्त विकासाच्या माध्यमातून क्रिसाला डेव्हलपर्सच्या स्थानिक तज्ज्ञतेचा आणि हिरानंदानी समूहाच्या प्रदीर्घ ब्रँड अनुभवाचा लाभ घेतला जाणार आहे. या दोन्ही संस्थांचे उद्दिष्ट जमिनीसंदर्भातील नियोजन, परवानग्या आणि अंमलबजावणी यासह सर्व घटकांचे समन्वय साधून उत्कृष्ट विकास करणे आहे. हिरानंदानी समूहाचे अध्यक्ष डॉ. निरंजन हिरानंदानी म्हणाले, "मुंबई आणि पुणे यांच्यातील महत्त्वाकांक्षी पायाभूत सुविधा प्रकल्प मुंबई - पुणेच्या कनेक्टिव्हिटीला चालना देत आहेत, ज्यामुळे MMR आणि पुणे रिअल इस्टेट मार्केट गतिमान झाले आहे. ही कनेक्टिव्हिटी स्थलांतरित होत असलेल्या व्यावसायिकांसाठी उच्च दर्जाचे राहणीमान उपलब्ध करून देत आहे. येथील आयटी हब्स, उत्कृष्ट दळणवळण सुविधा आणि कुशल व्यावसायिकांमुळे पुण्यात रिअल इस्टेट क्षेत्रात मजबूत वाढ होत आहे. या दोन प्रमुख व्यापारी शहरांमधील अखंड जोडणीमुळे रिअल इस्टेट विकासासाठी अभूतपूर्व संधी उपलब्ध झाल्या आहेत." क्रिसाला डेव्हलपर्सचे व्यवस्थापकीय संचालक श्री आकाश अग्रवाल यांनी आनंद व्यक्त करताना सांगितले, "मेगा पायाभूत सुविधा प्रकल्प या संकल्पनेवर आधारित ही टाउनशिप राहणीमान, समुदाय आरोग्य आणि पर्यावरणाविषयी जाणीव यावर भर देईल. हे टाउनशिप पहिल्यांदा घर खरेदी करणाऱ्या ग्राहकांपासून दुसऱ्या घराच्या शोधात असलेल्या खरेदीदारांपर्यंत, गुंतवणूकदार आणि एनआरआय ग्राहकांपर्यंत सर्वांसाठी समावेशक असेल. हा प्रकल्प शाश्वततेबाबत असलेल्या कटिबद्धतेमुळे वेगळा ठरणार आहे. आमच्या नामांकित ऊर्जा व संसाधन संस्थांसोबतच्या सहकार्यामुळे येथील हवेचा गुणवत्ता निर्देशांक (AQI) ४० च्या आसपास राखण्याचा आमचा प्रयत्न असेल, जेणेकरून रहिवाशांना निरोगी जीवन मिळेल."**

# 'आया रे तूफान' गाणं प्रेक्षकांच्या पसंतीस उतरलय !

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

'ऐका दाजिबा' म्हणत सर्व रसिक प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारी अतिशय लोकप्रिय गायिका वैशाली सामंत सध्या सर्वत्र चर्चेत आहे ते म्हणजे नुकताच रिलीझ झालेला छावा चित्रपटातील गाणं 'आया रे तूफान' साठी. वैशालीने आजवर अनेक सुपरहिट गाणी गायली आहेत पण यावेळी त्यांनी अक्षरशः सूरांची जादू दाखवत छत्रपती संभाजी महाराज आणि महाराणी येसुबाईंवर म्हणजेच विकी कौशल आणि रश्मिका मंदाना वर चित्रित ह्या गाण्यानी सर्वांना मंत्रमुग्ध केलंय. गाण्याबद्दलची आणखी एक उल्लेखनीय बाब म्हणजे, ए. आर. रहमान सोबत गायिका वैशाली सामंत हिला डूएट गाण्याची सुवर्ण संधी मिळाली. रहमान यांचा आवाज जादुई आहेच, पण वैशालीचा आवाज अंगावर रोमांच उभे करतो. छावा या चित्रपटाची गाणी खूपच गाजत आहे. 'आया रे तूफान' रिलीझ होताच काही तासांमध्ये युट्युबवर या गाण्याने लाखो व्युज मिळवले. प्रत्यक्षात हे गीत पाहताना ऊर अभिमानानं भरून येतो. मराठमोळी गायिका वैशाली सामंतने नक्कीच आपल्या सुरेल आवाजाने गाण्याची



शोभा वाढवली आहे. ऑस्कर विनिंग संगितकार ए. आर. रेहमान सोबत गाण्याची संधी मिळाली म्हणून वैशाली सामंत ह्यांनी आभार व्यक्त करताना आपलं मत मांडलंय ते म्हणाले "छावा चित्रपटाचं हे गाणं माझ्या वाटेला आलं हेच माझ्या सांगितीक वाटचालीतील खूप महत्वाचं गाणं आहे. ए.आर.रहमान सरांसोबत रेकॉर्ड करताना मला खूप काही शिकायला मिळालं, माझ्यातल्या गायिकेवर विश्वास दाखवला हे माझ्यासाठी खूप प्रेरणादायी आहे. गाण्याला भरपूर प्रेम मिळतंय. ऑडिओ लाँचच्या दरम्यान मला प्रत्यक्ष ए.आर.रहमान सरांसोबत गाता आलं हि खूप मोठी संधी होती त्यामुळे मी ए.आर.रहमान सरांचे आणि दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर सरांचे मनःपूर्वक आभार मानते."

# बुलेटचा आवाज काढणाऱ्यांवर कडक कारवाई

### जवळच्या माणसांच्या बुलेटवर कारवाई करु नये असा सांगणारा पुढारी कोण? हवेली तालुक्यात चर्चा

**सचिन सुंबे**

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**



लोणी काळभोर पोलीस ठाणे व वाहतूक शाखा यांच्या संयुक्त कारवाईत अनेक बुलेट सर स्वरांचे सायलेन्सर जप्त केले असून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली आहे त्यामुळे लोणी काळभोर पोलीस स्टेशन हद्दीत बुलेट करणाऱ्यांचा आवाज या कारवाईमुळे थंड झाला आहे.

अनेक बुलेट चालक त्यांच्या गाडीच्या सायलेंसरमध्ये बदल करून मोठ्या आवाजात गाड्या चालवतात व फटक्या सारखा आवाज काढतात अशी माहिती लोणी काळभोर पोलिसांना मिळाली होती. या आवाजामुळे नागरिकांना त्रास होत होता. तसेच अनेक बुलेट स्वार शाळा व काँलेज भरण्याच्या वेळेस व सुटण्याच्या वेळेस शाळा व काँलेज जवळ असा आवाज काढत तरुणींना त्रास देत होते. पोलिस अशा बुलेट चालकांवर कारवाई करतात का नाही याची नागरिकां मध्ये चर्चा सुरू होती.

पोलिसांनी बुलेटचा आवाज काढणाऱ्यांवर कडक कारवाई केली. त्यावेळी बुलेट पोलीस ठाण्यात आणल्या व त्यांच्यावर लोणी काळभोर पोलीस व वाहतूक शाखा दुचाकीगाड्यांवर कडक कारवाई केली. यामध्ये एकुण वीस बुलेट वर कारवाई केली. ही कारवाई लोणी काळभोरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक देवेंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक उदय काळभोर, पोलीस उपनिरीक्षक योगेश पैठणे, पोलिस अंमदार, सोमनाथ गळाकाटे, पोलीस हवालदार महेश चव्हाण, वाहतूक शाखेचे पोलीस हवालदार, योगेश काकडे, बापु बांगर, विकास ओव्हाळ यांनी कारवाई केली.

### एका पुढाऱ्याचा फोन पण कारवाई सुरुच

**यावेळी जवळच्या माणसावर कारवाई न करण्यासाठी एका पुढाकाराने सतत फोन करून दबाव आणण्याचा प्रयत्न केला. पण पोलिसांनी तो दबाव झुगारून कारवाई चालू ठेवली. मग तो स्थानिक पुढारी कोण याची चर्चा हवेली तालुक्यातील नागरिकांच्या मध्ये चांगलीच रंगली आहे.**

# एक बदनाम आश्रम सीझन ३ पार्ट २ करिता सज्ज व्हा-ट्रेलर प्रदर्शित!

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

अखेर प्रतिक्षा संपली! भारताचा सर्वाधिक पाहिले गेलेले थरार नाट्य, एक बदनाम आश्रम, जबरदस्त ॲक्शनसह 3ऱ्या सीझनच्या 2ऱ्या भागासोबत परत आले असून 27 फेब्रुवारी रोजी खास ॲमेझॉनची मोफत व्हीडिओ स्ट्रीमिंग सेवा, ॲमेझॉन एमएक्स प्लेयरवर प्रीमियरकरिता सज्ज आहे. या स्ट्रीमिंग सेवेने आज नवीन सीझनच्या हाय-व्होल्टेज ट्रेलरचे अनावरण केले. जे प्रेक्षकांना पुन्हा एकदा आश्रमाच्या विश्वात घेऊन जाईल. जिथे सत्ता, निष्ठा आणि सूड अनपेक्षित मार्गांनी




भिडतात. राष्ट्रीय पुरस्कार विजेते प्रकाश झा दिग्दर्शित आणि निर्मित, एक बदनाम आश्रम सीझन 3 पार्ट 2 मध्ये बॉबी देओल, अदिती पोहनकर, दर्शन कुमार, चंदन रॉय सान्याल, विक्रम कोचर, त्रिधा चौधरी, अनुप्रिया गोएंका, राजीव सिद्धार्थ आणि ईशा गुप्ता यांच्या प्रमुख भूमिका आहेत. लक्स नायट्रो, लाहोरी झिरा आणि स्पेशल पार्टनर केईआय वायर्स अँड केबल्स यांच्या सहकार्याने विमल यांनी या कार्यक्रमाची प्रस्तुती केली आहे. या ट्रेलरमध्ये बाबा निरालाच्या साम्राज्यात निर्माण झालेली दरी, पम्मीच्या निर्भय पुनरागमनामुळे जवळच्या मित्रांसोबत निर्माण झालेला तणाव आणि भोपा स्वामीची सत्तेची तहान याची झलक दिसते. न्यायाच्या प्रतिक्षेत, एक बदनाम आश्रम सीझन 3- पार्ट 2 रोमांचक कथेचा एक शक्तिशाली सातत्य, मनाच्या खेळांमध्ये खोलवर डुबकी मारणे, बदलती युती आणि आश्रमाला एकत्र ठेवणाऱ्या गडद सत्यांचे आश्वासन देतो. पण भिंती तडकू लागल्या असताना बाबा निराला आपल्या साम्राज्याला बळकटी देण्याचा मार्ग शोधेल की ही त्याच्या अंताची सुरुवात असेल? ॲमेझॉन एमएक्स प्लेयरचे कंटेंट हेड अमोघ दुसाद यांनी नवीन हंगामाबद्दल आपले विचार मांडले, ते म्हणाले, "एक बदनाम आश्रम ही भारतातील सर्वात मोठी मालिका आहे. या मालिकेने आपली अद्वितीय पात्रं आणि आकर्षक कथानकासह प्रचंड लोकप्रियता निर्माण केली आहे. बॉबी देओल मध्यवर्ती भूमिका साकारत असताना आणि प्रकाश झा यांच्या दिग्दर्शनाच्या कौशल्याबरोबर, प्रेक्षकांसाठी ॲमेझॉन एमएक्स प्लेअरवर आश्रमाचा पुढचा अध्याय पाहण्याची प्रतीक्षा करू शकत नाही." आपली भूमिका आणि चरित्र यावर भाष्य करताना, बॉबी देओलने व्यक्त केले, "आपण अजेय आहोत असा विश्वास बाबा निरालाला आहे. तो आणि त्याची शक्ती अतुलनीय आहे- परंतु सत्तेची गोष्ट म्हणजे- ती अस्थिर आहे. या सिझनमध्ये तो सर्वात असुरक्षित स्थितीत आहे. तरीही हेच त्याला आणखी धोकादायक बनवते.

# 'आयटीसीएक्स २०२५' मध्ये १५०० हून अधिक मंदिरे, राजकीय नेते आणि धर्मगुरू एकत्र

### मंदिर व्यवस्थापनाला नवी दिशा देण्याचा संकल्प

**तिरुपती (दै. आरंभ पर्व)**

आध्यात्मिक नगरी तिरुपती येथे आयोजित आंतरराष्ट्रीय मंदिर परिषद व प्रदर्शन आयटीसीएक्स २०२५ चा भव्य समारोप सोहळा नुकताच पार पडला असून हे संमेलन भारतातील सर्वात मोठे आणि प्रभावशाली मंदिर व्यवस्थापन परिषद ठरले. या ऐतिहासिक संमेलनात १,५०० हून अधिक मंदिरे, मान्यवर राजकीय नेते आणि हिंदू, शीख, बौद्ध आणि जैन धर्मांच्या पूजनीय धर्मगुरूंचा सहभाग पाहायला मिळाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या "विकसित भारत २०४७" संकल्पनेला अधिक बळकटी देत, हे संमेलन सनातन धर्माच्या शाश्वत मूल्यांना बळकट करत मंदिर प्रशासनाच्या भविष्याला, शाश्वतता आणि तंत्रज्ञान समावेशाला नवा आकार देणारे व्यासपीठ ठरले. मंदिर स्वायत्तता, स्मार्ट मंदिर मिशन आणि जागतिक सर्वोत्तम पद्धतींवर झालेल्या वैचारिक चर्चांमुळे आयटीसीएक्स २०२५ ने धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रगतीचे केंद्रे म्हणून मंदिरांची पुनर्कल्पना करण्यास नवा मापदंड स्थापित केला.

आयटीसीएक्स आणि टेंपल कनेक्टचे संस्थापक गिरीश कुलकर्णी आणि आयटीसीएक्सचे अध्यक्ष तसेच महाराष्ट्र विधान परिषदेचे मुख्य प्रतोद प्रसाद लाड यांच्या संकल्पनेतून साकारल्या गेलेल्या या महोत्सवाने मंदिर प्रतिनिधींना मंदिरे हिंदू समाजाची शक्ती केंद्रे म्हणून पुन्हा स्थापित होऊ शकतात यावर विचार करण्यास भाग पाडले.

भारताची मंदिर अर्थव्यवस्था ४-५ लाख कोटींवर पोहोचली आहे, जी कोणत्याही मोठ्या जागतिक उद्योगाशी तुलना करण्यासारखी आहे. या पार्श्वभूमीवर झालेल्या चर्चांमध्ये मंदिरांचे व्यवस्थापन व्यावसायिक संस्थांप्रमाणे चालविण्याची गरज अधोरेखित करण्यात आली जेणेकरून सामान्य जनतेच्या देणग्या वैद्यकीय मदत, शिक्षण, आरोग्य सेवा आणि लंगरद्वारे मोठ्या प्रमाणावर अन्नवाटप या उपक्रमांमधून थेट समाजाच्या कल्याणासाठी वापरल्या जातील. आपल्या दुसऱ्या संमेलनातच आयटीसीएक्सने मंदिर व्यवस्थापनाच्या पुनर्रचनेतील एक महत्त्वाचा प्रेरणास्रोत म्हणून आपली भूमिका मजबूत केली आहे.

"आयटीसीएक्स हे जागतिक स्तरावरील मंदिरांमधील मूलभूत विविधतेतील एकतेचे प्रतीक आहे आणि हे 'वसुधैव कुटुंबकम' या संकल्पनेचा एकप्रकारे उत्सवच आहे. २१वे शतक हे ज्ञानाधारित समाजाचे युग आहे. या दृष्टीने समृद्ध वारसास्थळांचे दस्तऐवजीकरण करणे, डिजिटल स्वरूपात संरक्षित करणे आणि तो जागतिक स्तरावर पोहोचवण्याच्या टेम्पल कनेक्टच्या प्रयत्नांना अधिक महत्व प्राप्त होते,



अशा शब्दात माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आयटीसीएक्सचे पत्राद्वारे कौतुक केले. या संमेलनाच्या पहिल्या दिवशी देवेंद्र फडणवीस (महाराष्ट्र), एन चंद्राबाबू नायडू (आंध्र प्रदेश) आणि प्रमोद सावंत (गोवा) हे तीन मुख्यमंत्री पहिल्यांदाच एकाच मंचावर एकत्र आले,यासह केंद्रीय मंत्री आणि भारताचे नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा राज्यमंत्री श्री श्रीपाद नाईक यांचीही उपस्थिती लाभली.


दुसऱ्या दिवशी भाजपाचे तामिळनाडू प्रदेशाध्यक्ष श्री के. अन्नामलाई आणि विश्व हिंदू परिषदेचे सरचिटणीस श्री मिलिंद परांडे यांनी हिंदू मंदिरांना सरकारी नियंत्रणातून मुक्त करण्याच्या उद्देशाने पुढाकार घेतला. संमेलनाचा शेवटचा दिवस देखील प्रभावशाली ठरला. आंध्र प्रदेशचे मानव संसाधन विकास मंत्री नारा लोकेश यांनी कबूल केले की, "विचारांचे नेतृत्व, कल्पनांची देवाणघेवाण आणि सर्वोत्तम पद्धती एकत्र आणण्यासाठी आयटीसीएक्स सारखे जागतिक दर्जाचे अधिवेशन गरजेचे आहे. आपण अशा युगात राहतो जिथे आपण स्पायडरमॅन, सुपरमॅन आणि ॲव्हेंजर्सबद्दल बोलतो, परंतु आपल्याकडे आपली संस्कृती (सांस्कृतिक वारसा) देखील आहे जी आपल्याला जतन करण्याची आवश्यकता आहे आणि ती खूप महत्वाची असणार आहे, असेही ते म्हणाले.

या भव्य कार्यक्रमाने वेगवेगळ्या पिढ्या आणि प्रदेशातील विचारवंत, आध्यात्मिक दिग्गज आणि बदल घडविण्याची इच्छाशक्ती असणाऱ्या व्यक्ती यांना त्यांच्या स्वतःच्या मंदिर परिसंस्थेमध्ये अचूक सामाजिक-आर्थिक सुधारणा करण्याच्या वचनबद्धतेदसाठी एकत्र आणले.

महाराष्ट्रातील मंदिर परिसंस्थांचे तज्ज्ञ आणि सध्या ऑस्ट्रेलियामध्ये कार्यरत असलेले श्री किरण शिंदे, तसेच योगी आदित्यनाथ यांचे अधिकृत चरित्रकार श्री शंतनु गुप्ता यांनी मंदिर व्यवस्थापन आणि सांस्कृतिक पुनरुज्जीवनावर महत्त्वपूर्ण विचार मांडले. सी. आर. मुकुंदा आणि लेखिका अमी गणात्रा यांनी ऐतिहासिक कथानकांचे वर्तमानाशी असलेले महत्त्व अधोरेखित करत या चर्चसत्राला अधिक समृद्धी केले. या संमेलनाने विविध पिढ्यांना जोडणारी आणि संपूर्ण भारतभरातील विद्वानांची परिषद म्हणून आयटीसीएक्सला 'मंदिरांचा महाकुंभ' म्हणून अधोरेखित केले. जिथे भारत आणि भारताबाहेरील मंदिर परिसंस्थांचे भविष्य यावरील संवाद, ज्ञानाची देवाणघेवाण आणि एकसंध दृष्टीकोन यांना चालना मिळते. हम्पी येथील पूज्यनीय श्री विद्यारण्य भारती स्वामीजी आणि कोविलूर मठाचे १४ वे पीठाधीश श्री ला श्री नारायण देसिका स्वामीगल यांच्या आशीर्वचनाने श्रोते प्रेरित झाले.

आयटीसीएक्सचे अध्यक्ष आणि महाराष्ट्र विधान परिषदेचे मुख्य प्रतोद श्री प्रसाद लाड यांनी "धर्मो रक्षति रक्षितः" हे धर्मग्रंथातील वचन उद्धृत करताना सांगितले कि, जर आपण धर्माचे रक्षण केले, तर धर्मही आपले रक्षण करतो. सनातन धर्माची हीच वैशिष्ट्ये आहेत कि जी केवळ उपासनेपुरता मर्यादित न राहता कर्तव्य, सत्य आणि सेवेसाठीचा एक आदर्श घालून देतात. भारताला २०४७ पर्यंत विकसित, सशक्त आणि आत्मनिर्भर राष्ट्र बनवण्याच्या व्यापक दृष्टिकोनाकडे बघितल्यास मंदिर आणि धार्मिक स्थळांच्या अर्थव्यवस्थेला देशाच्या मुख्य अर्थव्यवस्थेशी जोडले गेले, तर त्याचा राष्ट्रनिर्माणात महत्त्वपूर्ण वाटा असेल, असे ते म्हणाले.

## थोडक्यात



### राजगुरुनगर एसटी कर्मचाऱ्यांच्या वतीने शिवजयंती साजरी

राजगुरुनगर-किरण खुडे (आरंभ पर्व) : येथील राजगुरूनगर एसटी बसस्थानक व एसटी आगारात कर्मचाऱ्यांच्या वतीने शिवजयंती साजरी करण्यात आली. यावेळी आगार व्यवस्थापक उज्वला कुटे आणि सहायक वाहतूक निरीक्षक नासिर हवालदार, एम. एफ. सय्यद, कार्यशाळा अधिक्षक अनंत कुंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. शिवजयंतीनिमित्त किर्तनकार ह.भ.प. संस्कृती पवार यांनी शिवरायांच्या जीवनावर प्रबोधनपर व्याख्यान दिले. त्यांच्या व्याख्यानाने उपस्थित एस टी कर्मचारी व प्रवासी मंत्रमुग्ध झाले होते. आगार व्यवस्थापक उज्वला कुटे व कर्मचाऱ्यांची समायोजित भाषणे झाली. त्यानंतर शिवरायांची सामुहिक आरती करण्यात आली. बसस्थानकावर दिवसभर शिवज्योत प्रज्वलित ठेवण्यात आली होती. कर्मचाऱ्यांनी परिधान केलेले भगवे पोशाख उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होते. ध्वनीक्षेपकावरून लावलेले पोवाडे व देशभक्तीपर गीतांनी वातावरण भारून टाकले होते. कार्यक्रमाचे संयोजन आगार व्यवस्थापक उज्वला कुटे, गुलाब तिटकारे, संभाजी शिंदे , नागेश्वर वैरागर, प्रशांत होले, अजिंक्य फलके, राजेंद्र पवार, निलेश सातकर, माणिक थिगळे, राजेंद्र देवरे, बाळासाहेब नांगरे, अर्जुन वाघुले, अमित जगताप, संतोष एरंडे, पुष्पा चासकर, रुपाली मरभळ, रंजना बिराजदार, सुनिता कडलग, रुपाली व्यवहारे, स्वाती बिराजदार, निलम वाळुंज, मनिषा सुतार, दिगांबर पोटे, महादेव तुळसे यांनी केले.

### परिवहन महामंडळ लिमिटेड कर्मचाऱ्यांकडून महाराजांना अभिवादन



पुणे-लक्ष्मण साबळे (आरंभ पर्व) : पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड स्वारगेट आगार या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांना चालक वाहक व इतर कर्मचाऱ्यांकडून अभिवादन करण्यात आले. यावेळी शिवछत्रपती महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून सर्व कर्मचाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केले. यावेळी स्वारगेट आगाराचे प्रमुख माननीय शैलेंद् नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कामगार नेते हरीश ओव्हाळ, वाहक तानाजी कांबळे ,हंसराज मोहिते, भारत थोरात, प्रशांत कदम इतर कर्मचारी उपस्थित होते.

### मंचर एसटी कर्मचाऱ्यांच्या वतीने शिवजयंती साजरी

राजगुरुनगर (आरंभ पर्व) : मंचर (तांबडेमळा ) एसटी आगारात कर्मचाऱ्यांच्या वतीने शिवजयंती साजरी करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे आंबेगाव तालुका अध्यक्ष विष्णु काका हिंगे पाटील यांच्या हस्ते शिवप्रतीमेचे पुजन करुन पुष्पहार अर्पण करण्यात आला. शिवजयंतीनिमित्त आगारात महिला कर्मचाऱ्यांनी आकर्षक रांगोळी रेखाटली होती. तसेच आगारात आकर्षक सजावट केली होती. कार्यक्रमापूर्वी भाजपाचे तालुका अध्यक्ष संदीप बाणखेले यांच्या हस्ते दिपप्रज्वालन करण्यात आले. यावेळी भाजपाच्या जिल्हा सरचिटणीस ॲड. स्वप्ना पिंगळे, भाजपा मंचर शहर महिला आघाडीच्या छाया थोरात, आगारव्यवस्थापक बालाजी सुर्यवंशी, भाजपाचे जिल्हा सचिव प्रमोद बाणखेले तसेच योगेश बोऱ्हाडे, रविंद्र पांडे आदी उपस्थित होते. भाजपाच्या जिल्हा सरचिटणीस ॲड. स्वप्ना पिंगळे आपल्या भाषणात म्हणाल्या, कर्मचाऱ्यांनी महामंडळात आपली सेवा बजावताना छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मरण करावे. जेणेकरून आपल्याकडून प्रवाशांची सेवा करताना मावळ्यांची भूमिका बजावल्याचे समाधान मिळेल. यावेळी मान्यवरांची समायोचित भाषणे झाली. कार्यक्रमात कर्मचाऱ्यांनी परिधान केलेले भगवे पोशाख व भगवे फेटे उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होते. ध्वनीक्षेपकावरून लावलेले पोवाडे व देशभक्तीपर गीतांनी वातावरण भारून टाकले होते.

# एमआयटी एडीटी विद्यापीठात शिवजयंती जल्लोषात

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

सनई-चौघड्यांच्या मंजुळ स्वर, तुतारीच्या गगनभेदी गर्जना, ढोल-ताशांचा निनाद, भगव्या पताका, मर्दानी खेळ 'छत्रपती शिवाजी महाराज की जय!''जय भवानी, जय शिवराय!', 'नमो पार्वती पते, हर...हर.. महादेव'... या घोषणांचा जयघोष अशा जल्लोषपूर्ण वातावरणात येथील एमआयटी आर्ट, डिजाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठात महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५वी जयंती साजरी करण्यात आली.



विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारावरील छत्रपती शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याजवळ विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष प्रा.डॉ.मंगेश कराड यांच्या हस्ते हिंदवी स्वराज्याचे प्रतिक असणारा भगवा ध्वज फडकावून जयंती उत्सवास प्रारंभ करण्यात आला.

याप्रसंगी एमआयटी 'एडीटी'च्या कार्यकारी संचालक प्रा.डॉ.सुनीता कराड, कुलगुरू प्रा. डॉ.राजेश एस., प्र. कुलगुरू डॉ.मोहित दुबे, कुलसचिव डॉ.महेश चोपडे, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ.सुराज भोयार, परीक्षा विभाग संचालक डॉ.ज्ञानदेव निलवर्ण, डॉ.अतुल पाटील, डॉ.सपना देव आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी, लोणी-काळभोर व कदमवाक वस्ती ग्रामपंचायत येथील नागरिक, 'एमआयटी-एडीटी'चे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि शेकडो विद्यार्थ्यांच्या समोर विद्यार्थ्यांनी शिवरायांवरील कविता व पोवाडा आणि पाहाडी आवाजातील शिवगर्जना यामुळे उपस्थितांच्या अंगावर अक्षरशः रोमांच उभे राहिले. त्यानंतर विद्यार्थ्यांकडून सांस्कृतिक नृत्य व मैदानी खेळांची प्रात्याक्षिके देखील दाखवण्यात आली. शिवरायांची पालखीसह मिरवणूक व त्यानंतर अश्वारूढी पुतळ्याला क्रेनद्वारे पुश्पहार अर्पण केल्यानंतर महाराजांची आरती करून या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

यावेळी बोलताना, प्रा.डॉ.कराड म्हणाले की, माझ्या ऑफिस मध्ये असणाऱ्या छत्रपती शिवाजीराजांच्या मूर्ती पुढे नतमस्तक होऊन दिनक्रम सुरू करतो. कारण छत्रपती शिवराय हे उर्जेचा प्रचंड मोठा स्त्रोत आहेत.

आयुष्यात कितीही मोठ्या समस्या, संकटे आली तरी शिवचरित्र वाचल्यास त्यावर मार्ग सापडतो. त्यामुळे शिवराय आपल्यातच आहेत व ते आज ३९५ वर्षांचे झाले असल्याची भावना प्रत्येकाच्या मनात आहे. त्यामुळे शिवछत्रपतींचे गुण आत्मसात करण्याचा प्रत्येकाने प्रयत्न करणे हीच खरी शिवजयंती असेल, असा संदेशही त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

### रक्तदान शिबिराला उत्फुर्त प्रतिसाद

**शिवजयंतीच्या पार्श्वभूमिवर विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिर व गडकिल्ले बनविण्याच्या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्फुर्त प्रतिसाद लाभला. रक्तदान शिबिरात तब्बल २१६+ दात्यांनी रक्तदान केल्याने हे शिबिर अत्यंत यशस्वी ठरले. विद्यापीठाच्या नवीन आयटी इमारतीच्या प्रवेशद्वारावर या दोन्ही उपक्रमांचे आयोजन विद्यार्थ्यांकडून करण्यात आले होते. 'एमआयटी-एडीटी'च्या विद्यार्थ्यांनी रक्तदान शिबिरासारखे सामाजिक उपक्रम राबवून शिवजयंती साजरी केल्याने परिसरातील नागरिकांकडून त्यांचे कौतुक होत आहे.**

# सारोळे गावच्या प्रगतीचे सोनेरी पर्व : लोकनेते विलासदादा गाटे

## वाढदिवस अभिष्टचिंतन विशेष

**(दै. आरंभ पर्व)**

18 फेब्रुवारी 1953 रोजी जन्मलेले बार्शी तालुक्यातील सारोळे गावातील व परिसरातील जनतेचे आधारवड म्हणजे लोकनेते विलासदादा गाटे होय. त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांचे मनःपूर्वक अभिष्टचिंतन..

ऑन रेकॉर्ड विष्णू उर्फ विलास दादा निवृत्ती गाटे नाव असलेले दादांनी सारोळे गावचे विकासाचा अग्रलेख लिहिला असे म्हणावे लागेल. वारकरी संप्रदायातील शेतकरी कुटुंबात जन्म झालेल्या दादांनी प्राथमिक शिक्षण सारोळे येथे माध्यमिक शिक्षण उपळे दुमाला व पुणे येथे बीएससी ॲग्री ही पदवी घेतली. आणि शेती विभागामध्ये सर्वेक्षण अधिकारी म्हणून काम चालू केले...

सोलापूर जिल्ह्यातील वडाळा पडसाळी या भागामध्ये त्यांनी काम केले. तेथील वडाळा गावचे सरपंच असलेले बळीराम काका साठे यांच्या कामाने प्रभावित होऊन त्यांनाही समाजकारणाची ओढ लागली. आणि गावाच्या विकासासाठी योगदान देण्यासाठी प्रयत्न केला.

1977 साली गावातील अस्पृशता निवारणासाठी पहिले पाऊल उचलत कोणतेही पद नसतानाही जनजागृतीच्या माध्यमातून एक गाव एक पाणवठा ही योजना सुरू केली.

तत्कालीन जिल्हा परिषद अध्यक्ष विजयसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते उद्घाटन केले.

जनतेचे प्रश्न सुटले पाहिजे ह्या भावनेतून 1979 साली ग्रामपंचायत निवडणूक लढवली. आणि पहिल्याच टर्ममध्ये सरपंचही झाले.

पुन्हा 1989 साली पुन्हा सरपंच,1993 साली शरदचंद्रजी पवार प्रशाला सारोळेची स्थापना झाली. शासन दरबारी पाठपुरावा करून मंजुरी मिळवली. शेळगाव शिक्षण प्रसारक मंडळ च्या संचालक पदी त्यांची निवड झाली. स्कूल कमिटी चेअरमन म्हणून त्यांनी धुरा घेतली. पुढे 1997साली बार्शी पंचायत समिती सदस्य,1999 साली उपसरपंच पद भूषवले.

तालुक्याच्या शेवटच्या टोकाचे असलेले सारोळे गाव दुर्गम होते.गावामध्ये लाईटची सुविधा नव्हती ती सुविधा सुरू केली. खऱ्या अर्थाने गाव प्रकाशित झाले.

गावातील मुलांसाठी भव्य तालीम तयार करून त्यावर ग्रामपंचायत कार्यालय बांधण्यात आले. गावातील सर्व शिवरस्ते बांधले.

सारोळे ते भांडेगाव ,सारोळे ते कासारी ,सारोळे ते दहिवडी



सारोळे ते धामणगाव शिव,

सारोळे ते जवळगाव रस्ते रस्त्याचे करण्यात आले. प्रकल्पातील जुनी भांडेगाव व आंबेगाव या गावांना जोडणारे दीड किलोमीटरचे शेतरस्ते निर्माण करण्यात आले."यशवंतराव चव्हाण "सभागृह ,"आणि विलासदादा

बार्शी पंचायत समिती मधील यशवंतराव चव्हाण सभागृह हे नाव विरोधी सदस्य असतानाही आग्रहाने नावाची शिफारस दादांनी केली. सभागृहाचे हे नाव

तत्कालीन आमदारांनी ही नाव बदलण्याचा प्रयत्न केला मात्र दादांच्या अफाट जिद्दीमुळे तो यशस्वी होऊ शकला नाही .परंतु शेवटी तो ठराव ऑन रेकॉर्ड त्यांच्याच सदस्याच्या नावावर जाणीवपूर्वक नोंदविण्यात आला. जेणेकरून विलासदादांना श्रेय मिळू नये यासाठी हा प्रयत्न केला. परंतु यशवंतराव चव्हाण सभागृह हे नाव विलासदादा गाटे यांनी दिले आहे. हेच सत्य असल्याचे तत्कालीन पुढारी आजही कबूल करतात.

सकाळपासून रात्रीपर्यंत जनसेवेला प्राधान्य देणारे ते एकमेव नेते असावे. तालुक्याच्या ठिकाणी प्रशासकीय अधिकाऱ्याकडून चिकटीने कामे करून घेण्यात त्यांचा मोठा हातखंडा होता.

आणि कोणत्याही अधिकाऱ्यांचे प्रलोभन किंवा कोणतेही अमिष न देता कामे करून घेतली.

सामाजिक जीवनामध्ये होणारे तंटे निवारण्याचे कामही त्यांनी केले. आणि कोणावर अन्याय होत असल्यास त्यांना ताकदही दिली.गावाचा चेहरा मोहरा बदलण्याचे श्रेय विलासदादाना जाते.

प्रत्येक कामाच्या उरलेल्या पैशातून वाढीव काम करण्याची त्यांना आवड होती. गावामध्ये विविध मंदिरे, सभागृह बांधण्यात त्यांचे योगदान असायचे.

भव्य दिव्य ग्रामपंचायत कार्यालय बांधले व पोर्च हा आगाऊ बांधला. कोणत्याही कामातला एकही पैसे राहता कामा नये वरून त्यात पैसे घातले तरी चालतील सर्व कामे ही दर्जेदार करून घेणे हा त्यांचा पिंड होता..

तत्कालीन तालुक्याचे नेते असलेल्या प्रस्थापितांच्या विरोधात काँग्रेस तर्फे गौडगाव गटातून पंचायत समिती सदस्य म्हणून निवडून आले. ही खरी त्यांची ताकद होती.

जर तुम्ही चांगले काम केले तर जनता ही तुम्हाला स्वीकारणार यासाठी सत्तेच्या वाटेने चालावे लागते हा आदर्श दादांनी घालून दिला.

भक्कम आर्थिक ताकद नसतानाही कार्यकर्त्यांच्या व कार्याच्या बळावर दादांनी ही पंचायत समिती निवडणूक जिंकून तालुक्यात आपले अस्तित्व दाखवून दिले.

सारोळे ता. बार्शी या गावाला पाणीदार गाव अशी ओळख आहे. मात्र दादांनी रोजगार हमी योजनेच्या मार्फत सर्व पाणी साठ्यांचे पुनर्जीविकरण , मोठ्या प्रमाणात बंधारे बांधले. तलावांचे मजबुतीकरण करण्यात आले. गावात पाणी पुरवठा करण्यासाठी विहीर घेण्यात आली.

नंतर ती बांधून घेण्यात आली.सर्वात जास्त पाणी असलेली विहीर ती एक असल्यामुळे कधीही पाणी निघत नाही.

ही विहीर त्यातून पाणीपुरवठा करण्याचा त्यांचा निश्चय पूर्ण झाला. यशाबरोबरच अनेक कटू प्रसंग सहन करत आजपर्यंत प्रवास दादांचा सुरूच आहे.

जनसेवेचा वसा घेतलेल्या ह्या परिवाराने अनेकांना आसरा दिला. राजकीय संघर्षामध्ये भक्कम साथ देणारा भाऊ गमावला.आई,पुतण्या यांचे अकाली निधन झाले. तरीही त्यांनी व परिवाराने संघर्ष करत आपले अस्तित्व कायम राखले. सध्या असलेल्या ग्रामपंचायत टिमचे आधारस्तंभ या नात्याने आणखी जनहितार्थ कामे करण्याकडे त्यांचा कल आहे. त्यांच्याबरोबर

त्यांचे पुतणे मा.सरपंच बाळराजे गाटे सध्या राजकारणात सक्रिय आहेत.

गेल्या अनेक वर्ष पासून गावचे सरपंच, पंचायत समिती सदस्य विधी सेवा समिती सदस्य असलेले दादा म्हणजे

सारोळे गावाचे चालते बोलते विद्यापीठ म्हणलं तरी वावगे ठरणार नाही. नवीन पिढीतील युवकांनी आर्थिक नाडी भक्कम केली पाहिजे. त्यानंतर राजकारणाकडे वळावे. शिवाय राजकारण करायचे असेल तर वेळ द्यायला हवा. जनतेचे प्रश्न सुटले पाहिजे ही भावना असायला हवी.

जर तुमची धारणा सत्याची असेल तर तुम्हाला सत्ताधारी होण्याची गरज नाही. तुम्ही तुमची कामे जिद्दीने हातोटीने पूर्ण करू शकतात त्यासाठी प्रयत्न तरी करायला हवे. अशी भावना विलासदादांनी बोलून दाखवली...

दादा तुम्हाला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!!

**शब्दांकन लेखन : लक्ष्मण साबळे**
**8605284272**

# 'शिवसप्ताहातून उलघडले शिवचरित्र' महेश विद्यालय मराठी माध्यमाचा अनोखा उपक्रम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळ संचलित महेश विद्यालय मराठी माध्यम (सेमी) कोथरूड, पुणे या शाळेत दिनांक 11 ते 18 फेब्रुवारी या कालावधीत शिवसप्ताहाचे आयोजन केले होते. इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचे सादरीकरण केले. सात दिवसांचे विविध पुष्प मुलांच्या कल्पकतेला व बुद्धीला क्रियाशीलतेला वाव देणारे होते.



पुष्प पहिले महाराजांच्या जीवनावर आधारित पोवाडे सादर करून कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. पुष्प दुसरे गोष्टी व कथाकथन यांनी भारावले होते. इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनावरील प्रसंग पार्थ गोंडाळ याने कथाकथनातून मांडले. तिसरे पुष्प घेऊन आले निबंध वक्तृत्व-निबंध. यासाठी महाराष्ट्राचे लाडके दैवत छत्रपती शिवाजी महाराज हा विषय निवडला. पेटाऱ्यातून प्रसार, औरंगजेबाचा 50 वा वाढदिवस यावरील इयत्ता चौथीतील आराध्या काळे, युवराज हंबर्डे, समर्थ बुनगे यांचे वक्तृत्व प्रभावी ठरले. प्रश्नमंजुषा ही विद्यार्थ्यांच्या विचारांना चालना देणारी चौथा पुष्पाची मानकरी ठरली. यातील विविध फेऱ्यांमध्ये शिवाजी महाराजांच्या कार्यकर्तुत्वावर व जीवनपटाची माहिती देणारे प्रश्न प्रेक्षकांचे आकर्षण ठरले. पुष्प पाचवे रायरेश्वराच्या मंदिरात स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा, गड आला पण सिंह गेला या नाटकांनी भारून गेले. सहाव्या पुष्पामध्ये चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. शिवाजी महाराजांच्या जीवनावरील प्रसंग विद्यार्थ्यांनी रेखाटले. पुष्प सातवे महाराजांचा राज्याभिषेक हे होते. यावेळी फुलांच्या पायघड्या, सप्त नद्यांचे पाणी, मंत्रोच्चार, मावळे सरदार, ढोल - ताशा - नगाडे तुताऱ्यांचा नाद यांनी वातावरण भारावले. छत्रपती शिवाजी महाराज, सरदार, मावळे यांच्या वेशभूषेतील विध्यार्थ्यांमुळे कार्यक्रमात सजीवता आली. जणू काही खरा राज्याभिषेक सोहळा पाहत आहोत असे प्रतीत होते. पूर्व प्राथमिक ते इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी हा कार्यक्रम होता. आपला इतिहास विद्यार्थ्यांना माहिती व्हावा, त्यांच्या अंगी असलेल्या सुप्त कलागुणांना संधी मिळावी हा कार्यक्रमाचा उद्देश होता.

महेश विद्यालय शाळा समितीचे अध्यक्ष सचिन मंत्री यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन केले. स्वाती माहेश्वरी, पद्मा लोया, रीना भुतडा, नीरज मोदाणी, नेहा जाजू, गोपाल जाजू, तसेच सर्व शिक्षा अभियानाच्या पर्यवेक्षिका आनंदी वनवे मॅडम, दत्तात्रय पाटील या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता तिसरीतील कीर्ती शितळकर, चौथीतील सर्वज्ञा कट्टे, विद्या भोईटे यांनी केले. कार्यक्रमाची संकल्पना विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. जान्हवी आजोतीकर यांची होती.

# भूपेंद्र मोरे यांच्या कायम पाठीशी राहणार : सौ. रूपालीताई चाकणकर

**लक्ष्मण साबळे**

- शिवराज्य समूहातर्फे शिवजयंती निमित्त होम मिनिस्टर कार्यक्रम संपन्न
- शिवराज्य समूहाच्या "होम मिनिस्टर "कार्यक्रमास महिलांचा प्रतिसाद!!



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे भागातील नागरिकांच्या समस्यांसाठी धावून जाणारा कार्यकर्ता म्हणून भूपेंद्र मोरे यांची ओळख आहे. त्यांच्या पाठीशी राहून त्यांना आगामी काळामध्ये ही सहकार्य करेल अशी भावना राज्य महिला आयोगाचे अध्यक्ष सौ रुपालीताई चाकणकर यांनी व्यक्त केली.

शिवराज्य समूह, भूपेंद्र मोरे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त होम मिनिस्टर खेळ पैठणीचा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला . त्यावेळी त्या बोलत होत्या.

आगामी काळात आपण सर्वजण भूपेंद्र मोरे यांच्या सारख्या कर्तबगार नेतृत्वास योग्य संधी द्याल हा विश्वास मला वाटतो .असेही त्यांनी म्हटले .

राजलक्ष्मी आयकॉन येथे झालेल्या ह्या कार्यक्रमास महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या कार्यक्रमानिमित्त लहान मुलांचे नृत्य, ज्येष्ठ महिलांचा सन्मान, पत्रकारांचा सन्मान, स्वच्छता करणाऱ्या महिला भगिनींचा ही सत्कारही यावेळी करण्यात आला.

### आणि आजीबाई नाचू लागल्या...

**शिवराज्य समूहाच्या या होम मिनिस्टर कार्यक्रमांमध्ये जेष्ठ महिला सदस्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी निवेदकांनी सर्व आजीबाईना नृत्य करण्याची विनंती केली. आणि सत्तर वर्षाच्या आजीबाई शांताबाई...... गाण्यावर नाचू लागल्या. तणावमुक्त जीवन जगा असाच एक संदेश ह्या निमित्त उपस्थितांना मिळाला. याची हीच सर्वत्र चर्चा सुरू होती.**



या होम मिनिस्टर स्पर्धेमध्ये सौ.पल्लवी वसवे या मानाच्या पैठणीच्या मानकरी ठरल्या. सायली सातकर याना द्वितीय बक्षीस नथ ,तर शामल कदम यांना तृतीय क्रमांकाचे बक्षीस चांदीचा करांडा मिळाले.

या कार्यक्रमासाठी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपालीताई चाकणकर खडकवासला राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष प्रदीपबाबा धुमाळ, आयोजक भूपेंद्र मोरे , नेहा ताई मोरे, अंजली मोरे, यशस्वी वैद्य, सुजाता सतीश वैद्य, आशा पवार, ज्योती दारुण्डे, सोनाली नायर, सविता डोगे, आयेशा मणियार,सोनाली दिघे, यांच्यासह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे निवेदन नितीन कोकणे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश लोंढे यांनी केले.

अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणामध्ये हा होम मिनिस्टर कार्यक्रम संपन्न झाला.

### शिवराज्य समूहातर्फे अल्प दरात रुग्णवाहिकेचे लोकार्पण

**शिवजयंतीचे औचित्य साधून शिवराज्य समूहातर्फे जनतेची मागणी लक्षात घेता अल्प दरामध्ये सेवा देणाऱ्या रुग्णवाहिकेचे लोकार्पण राज्य महिला आयोगाचे अध्यक्ष सौ. राज्य रुपालीताई चाकणकर यांच्या हस्ते करण्यात आले. पुणे व शहर परिसरातील नागरिकांना रास्त दरामध्ये ही सुविधा उपलब्ध होणार आहे. ह्यातून ज्येष्ठ नागरिक तसेच रुग्णांची चांगली सोय होणार आहे. यावेळी भूपेंद्र मोरे यांच्यासह राजाभाऊ जाधव, विठ्ठल सूर्यवंशी, अमर, शिवराज्य समूहाचे कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते..**

### आगामी काळातही जनसेवेत सक्रिय : मोरे

**गेल्या अनेक वर्षापासून शिवराजे समुहाच्या मार्फत महिलांसाठी विविध उपक्रम राबविण्याचे अखंडपणे कार्य सुरूच आहे. यापुढेही तत्परने जनतेच्या प्रश्नासाठी कायमच सक्रिय राहणार आहे अशी भावना श्री .भूपेंद्र मोरे यांनी यावेळी बोलताना निमित केली. महिलांसाठी यापुढेही आणखी काही उपक्रम राबवण्याचा आपला प्रयत्न असणार आहे असाही मनोदय त्यांनी यावेळी बोलून दाखवला.**

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.